**<u>सं. फौज.केस क्रमांकः ३७३/२०२१</u>**
**महाराष्ट्र शासन ..वि.. हेमराज गौरी**
**<u>निशाणी क्रमांकः– ९ खाली</u>**

साक्षीदार क्रमांक **६** अभियोग पक्षाकरीता
शपथेवर बयाण देतो की,

माझे नाव — **अमरदिप प्रभाकर खाडे,**
वय – ३७ वर्षे,
व्यवसाय – सहा.पो.निरीक्षक,
राहणार – रामनगर पोलीस स्टेशन, जि.चंद्रपुर

**<u>सरतपास — श्री. ए. एस. उईके, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे मार्फत शपथेवर सुरू–</u>**

१. आरोपी हेमराज गौरी यास मी ओळखतो व फिर्यादी चांगदेव ढोरे यांसही मी ओळखतो. दिनांक २९.०७.२०२१ रोजी मी लाखांदुर पो.स्टे. येथे पो.उप.निरीक्षक म्हणून कार्यरत होतो. सदर दिवशी माझी डी.ओ.ड्युटीवर नियुक्ती होती. वडसा ते साकोली रोडवर अपघात झाल्याची माहीती प्राप्त झाली. त्यानंतर आम्ही घटनास्थळी पोहोचलो. तेथे एका बसचा व दुचाकीचा अपघात झाला होता. दुचाकीवरील अपघातग्रस्त शैलेश तलमले यांना अगोदरच दवाखाण्यात रवाना केल्याची माहीती चांगदेव ढोरे यांनी आम्हाला दिली. तेव्हा सदर ठिकाणी हजर असलेले शकीन करीम शेख रा.गांधीवार्ड, लाखांदुर व राजेंद्र मारोती दोनाडकर रा.वार्ड क्र.८, लाखांदुर यांना घटनास्थळ पंचनाम्याला पंच म्हणून उपस्थित राहणेकामी विनंती करण्यात आली. आता मला मी शकीन शेख व राजेंद्र दोनाडकर यांना दिलेले सुचनापत्र दाखविले. त्यावर माझी व त्यांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. सदरील सुचनापत्रांस **<u>नि.क्र.२०</u>** देण्यात येत आहे.

२. चांगदेव ढोरे यांच्या दाखवण्याप्रमाणे पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा घटनास्थळी तयार करण्यात आला. मोक्यावर दुचाकी क्रमांक एम.एच.३१–बी.क्यू.४५४९ ही अपघातग्रस्त होऊन रोडच्या डाव्या बाजूला पडल्याचे मला दिसून आले. तसेच रोडवर रक्त सांडल्याचेही मला दिसून आले. बस क्र. ४०–वाय–५५४९ जिच्यावर तुमसर ते गडचिरोली अशी पाटी होती, सदर बसकडे बोटाने दर्शवून फिर्यादी यांनी सांगीतले की, या बसच्या चालकाने निष्काळजीपणाने व भरधाव वेगाने त्याच्या ताब्यातील बसने मो.सा.क्र. एम.एच.३१–बी.क्यू.४५४९ चा चालक शैलेश तलमले यास धडक देऊन जखमी केले व ते घटनास्थळ हेच आहे असे त्याने सांगीतले. घटनास्थळावर पडलेले रक्त व रक्त मिश्रीत माती पचांसमक्ष जप्त करण्यात आली. घटनास्थळाच्या चतु:र्सिमा नोंदविण्यात आल्या. मोक्यावर घटनास्थळ पंचनामा तयार करुन १८.१० वाजता सुरु करुन १८.५० वाजता संपवण्यात आले. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावर माझ्या व दोन पंचांच्या सह्या आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे. घटनास्थळ पंचनामा नि.क्र.१४ वर आहे.

३. आता मला जप्ती पंचनामा दाखविला. त्यावर माझ्या व दोन पंचांच्या सह्या आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे. जप्ती पंचनामा **नि.क्र.२१** वर आहे. पुढील तपास पुंडलिक मस्के साहेबांनी केला.

**उलटतपास आरोपीचे वकिल श्री.आर.जे.पिलारे यांचे मार्फत–**

४. हे म्हणने खरे आहे की, घटनास्थळ पंचनामा जेथे तयार करण्यात आला तो सिमेंट रोड आहे. आता मला घटनास्थळ पंचनामा नि.क्र.१४ मधील वाक्य की, घटनास्थळी उभ्या असलेलया बसचे निरीक्षण केले असता बसच्या वाहकाकडील दरवाज्याला मोटार सायकल घासल्याचे निशान दिसत आहे हा वाचून दाखविला, सदरील मजकूर बरोबर आहे. हे म्हणने खरे नाही की, मी घटनास्थळी घटनास्थळ व जप्ती पंचनामे केले नाही.

५. हे म्हणने खरे नाही की, शकीन शेख व राजेंद्र दोनाडकर हे आमचे नेहमीचे

पंच आहेत. हे म्हणने खरे नाही की, ते आमच्या ओळखीचे आहेत. हे म्हणने खरे नाही की, पंचनाम्यांवर घटनास्थळी सह्या न घेता पो.स्टे. ला पंचांच्या सह्या घेतल्या. हे म्हणने खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला**.

**फेरतपास काही नाही**.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वा/–

दिनांकः–०६/१२/२०२३

**(श्रीमती पूजा ना. कोकाटे)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

लाखांदूर